# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७, डॉ.आंबेडकर रोड पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.परिपत्रक-२०२३/(११२०/२३)/पुणे विभाग दि.१२-०४-२०२३

प्रति,

कुलसचिव/संचालक,

१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
२) गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
३) डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे
४) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
५) कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
६) कुलसचिव/संचालक, सर्व स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे, पुणे
७) प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वायत्त कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, पुणे/अहमदनगर/नाशिक.

विषय:- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्व अकृषी विद्यापीठे/ महाविद्यालयांनी कार्यकम आराखडा तयार करुन कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत...

संदर्भ:- मा.संचालनालयाकडील क्र.जयंती-२०२३/मवि-१/४५७८, दि.१२-०४-२०२३ रोजीचे परिपत्रक.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय परिपत्रक अवलोकनी घ्यावे. (प्रत संलग्न)

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. भारतीय लोकशाही व्यवस्थेची पायाभरणीबरोबर त्यांनी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्टया मौलिक असे योगदान भारतीय समाजाला दिले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांचे प्रेरणास्थान आहे. त्यांच्याप्रति कृतज्ञताव्यक्त करण्यासाठी आणि आधुनिक भारत घडविण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची समाजाला व विशेषत: शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रेरणा मिळावी यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याशी संबंधित विषयावर परिसंवाद, त्यांच्या विचारधारांवर आधारित ग्रंथोत्सव, निंबध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आदी नावीन्यपूर्ण उपक्रम / कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

विद्यापीठ, महाविद्यालये यांनी आयोजित केलेल्या उपक्रमांना स्थानिक वर्तमानपत्रात पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी तसेच अनुपालन अहवाल विद्यापीठाच्या कुलसचिवांनी विद्यापीठाचा व त्यांचेशी संलग्नित महाविद्यालयांच्या अहवाल संकलित करुन या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

(डॉ.किरणकुमार बोंदर)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे १.

सोबत:- वरीलप्रमाणे.

प्रत:- मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.